RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-अ

वर्ष १२, अंक ६३(४)] शुक्रवार, मे १५, २०२६/वैशाख २५, शके १९४८ [पृष्ठे ४५, किंमत : रुपये १५.००

असाधारण क्रमांक १९४

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ मे २०२६.

अधिसूचना

महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनीची पुनर्रचना आणि हस्तांतरण योजना, २०२६.

क्रमांक संकीर्ण-२०२६/ प्र. क्र. ९९/ ऊर्जा ५.—विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १३१ च्या पोट-कलम (४) आणि (५) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने त्यांच्या दिनांक २८ मार्च, २०२५ रोजीच्या आदेशान्वये, प्रकरण क्र. २१७/२०२४ (नियंत्रण कालावधी आर्थिक वर्ष २०२५-२६ ते आर्थिक वर्ष २०२९-३० साठीचा बहुवार्षिक दर आदेश) मध्ये दिलेल्या निर्देशांनुसार, ज्यामध्ये माननीय आयोगाने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला म्हणजेच (महावितरण कंपनी) कृषी व्यवसायावर देखरेख ठेवण्यासाठी आणि त्याचे उत्तरदायित्व सुनिश्चित करण्यासाठी एक स्वतंत्र 'कृषी कंपनी' स्थापन करण्याचे निर्देश दिले होते, आणि या योजनेनुसार अपेक्षित हस्तांतरणानंतर, महावितरण कंपनी उर्वरित व्यवसाय (पुढे परिभाषित केल्याप्रमाणे) चालू ठेवेल आणि कृषी संस्था स्वतंत्र उपक्रमांमार्फत कृषी व्यवसाय चालवेल, असा हेतू असल्याने, शासन याद्वारे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (MSEB) सोलर ॲग्रो पॉवर लिमिटेडला (MSAPL) वाटप करावयाच्या महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेडची मालमत्ता, मालमत्तेतील हितसंबंध, हक्क आणि दायित्वे परिभाषित करण्यासाठी आणि अशा हस्तांतरणाच्या अटी व शर्ती निश्चित करण्यासाठी पुढील योजना तयार करत आहेः—

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती आणि प्रारंभ

१.१ या योजनेला 'महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीची पुनर्रचना आणि हस्तांतरण योजना, २०२६' असे म्हणावे.

१.२ ही योजना संपूर्ण राज्यास लागू असेल आणि राज्याबाहेर स्थित असलेल्या महावितरण कंपनीच्या सर्व मालमत्ता, हितसंबंध, हक्क, दायित्वे, कार्यवाह्या आणि कर्मचारी यांना देखील लागू असेल.

१.३ ही योजना १ एप्रिल, २०२६ पासून अंमलात आली असल्याचे मानण्यात येईल.

२. व्याख्या

२.१ या योजनेत, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तरः

(क) "**अधिनियम**" याचा अर्थ विद्युत अधिनियम, २००३ असा आहे ;

(ख) **"कृषी संस्था" (Agri Entity)** याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (MSEB) सोलर ॲग्रो पॉवर लिमिटेड, जी (MSEB) होल्डिंगची संपूर्ण मालकी असलेली उपकंपनी असा आहे. ही अशी कंपनी आहे जिच्याकडे या योजनेनुसार महावितरण कंपनीचा कृषी व्यवसाय हस्तांतरित केला जाणार आहे आणि ही कंपनी कृषी व्यवसाय चालवण्याच्या प्रयोजनार्थ अधिनियमाच्या कलम १३१ चे पोट-कलम (४) आणि (५) च्या परिभाषेतील ' मानीव वितरण परवानाधारक' असेल;

(ग) **"कृषी व्यवसाय"** याचा अर्थ, महावितरण कंपनीकडून करण्यात येणाऱ्या पुरवठा क्षेत्रातील महावितरण कंपनीच्या कृषी ग्राहकांना विजेच्या किरकोळ पुरवठ्याशी संबंधित महावितरण कंपनीचा स्वतंत्र व्यवसाय विभाग आणि उपक्रम असा आहे; जो नियत दिनांकाच्या लगत पूर्वी महावितरण कंपनीद्वारे चालवला जात होता आणि त्यानंतर कृषी संस्थेद्वारे चालवला जाईल, ज्यामध्ये खालील बाबींचा समावेश असेल;

(एक) कृषी ग्राहकांशी संबंधित सर्व उपक्रम, ज्यामध्ये ग्राहक नोंदणी, नवीन जोडणी देणे (असल्यास), ग्राहकांच्या नोंदीं ठेवणे आणि आयोगाने वेळोवेळी जारी केलेल्या नियमांनुसार आणि आदेशानुसार, कृषी ग्राहकांना ग्राहक सेवा पुरवणे,

(दोन) कृषी ग्राहकांच्या विजेची गरज भागवण्यासाठी विशेषकरून, महावितरण कंपनीच्या माध्यमातून बाह्यस्त्रोतमार्फत (आउटसोर्स) सेवा पुरवणे' - मग ते बाह्यस्त्रोत म्हणून असो किंवा कंपनी – अंतर्गत व्यवस्थेनुसार असो वीज खरेदी, वेळापत्रक (scheduling) आणि वीज पुरवठा व्यवस्थापनाची सोय करणे;

(तीन) कृषी ग्राहकांना होणाऱ्या वीज पुरवठ्याबाबत विद्युत देयके (बिलिंग) आणि वसुली याची जबाबदारी;

(चार) विशेषतः कृषी ग्राहकांशी संबंधित सर्व परवाने, परवानग्या, मंजुरी, संमती, लाभ, नोंदणी आणि हक्क;

(पाच) कृषी व्यवसायाशी संबंधित किंवा त्या संदर्भात वापरले जाणारे सर्व बौद्धिक संपदा हक्क (Intellectual Property Rights), व्यापारचिन्ह (ट्रेडमार्क), व्यापार नावे आणि ख्यातिमूल्य (goodwill);

(सहा) कृषी व्यवसायाशी संबंधित सर्व करारांचे (Contracts) फायदे;

(सात) कृषी व्यवसाय आणि कृषी ग्राहकांशी संबंधित सर्व व्यवसायाचे अभिलेख (Business Records);

(आठ) आयोगासमोरील आणि इतर संबंध प्राधिकरणांसमोरील विशेषतः कृषी ग्राहकांशी संबंधित सर्व नियामक अर्ज, दाखल करणे, वीज दर अर्ज अर्थसहाय्याचे मूल्यांकन आणि अनुपालन जबाबदाऱ्या;

(नऊ) कृषी ग्राहक आणि कृषी व्यवसायासाठी राज्य सरकारकडून मिळणारी अनुदाने (Grants), अर्थसहाय्य (सबसिडी) आणि वित्तीय सहाय्य यांचे व्यवस्थापन, हिशेब ठेवणे आणि लेखांकन; तसेच त्यांचा वापर (१) वीज खर्च प्रतिपूर्ती; आणि (२) महावितरण कंपनीला देय असलेल्या सेवा शुल्कासाठी करणे;

(दहा) महावितरण कंपनीला 'वीज खर्च प्रतिपूर्ती' (Power Cost Reimbursement) अदा करणे;

(अकरा) पुरवलेल्या बाह्यस्त्रोतामार्फत (आउटसोर्स) सेवांची तरतूद करण्याकरिता महावितरण कंपनीला 'सेवा शुल्क' (Service Charges) अदा करणे;

(बारा) कृषी व्यवसायाशी संबंधित सर्व दायित्वे, कर्ज, कर्तव्ये आणि आबधने (आकस्मिक दायित्वांसह);

(तेरा) कृषी व्यवसायाशी संबंधित सर्व कायदेशीर कार्यवाह्या; आणि

(चौदा) कृषी संस्थेने पार पाडण्यासाठी महावितरण कंपनी आणि कृषी संस्था यांच्यात मान्य झालेले आणि / किंवा कृषी व्यवसायाशी सहाय्यभूत आणि आनुषंगिक असलेले इतर उपक्रम;
कोणतीही शंका राहू नये म्हणून, कृषी व्यवसायामध्ये खालील बाबींचा समावेश होणार नाही:

क. वितरण मत्तेची (Distribution Assets) मालकी, कार्यान्वयन आणि देखभाल, जी महावितरण कंपनी कडेच राहील;

ख. वितरण मत्तेद्वारे विजेचे वहन (Wheeling);

ग. वितरण मत्तेचा विकास, कार्यान्वयन आणि देखभाल;

घ. कृषी ग्राहकांव्यतिरिक्त इतर ग्राहकांना (उदा. औद्योगिक, व्यावसायिक, निवासी आणि इतर सर्व ग्राहक श्रेणी) होणारा वीज पुरवठा;

ड. सर्व 'वगळलेली मत्ता' (Excluded Assets), 'वगळलेले करार' (Excluded Contracts), 'वगळलेली दायित्वे' (Excluded Liabilities) आणि 'वगळलेल्या व्यवसायाचे अभिलेख' (Excluded Business Records); आणि

च. उर्वरित व्यवसाय (Remaining Business).

शंका दूर करण्यासाठी असे स्पष्ट करण्यात येते की, एखादी विशिष्ट मालमत्ता, दायित्व, करार किंवा कसे याबाबत प्रश्न उद्‌भवल्यास किंवा कार्यवाही कृषी व्यवसायाशी संबंधित आहे किंवा कसे किंवा त्याच्या कामकाजातून उद्‌भवली आहे किंवा कसे, याबाबत कोणताही प्रश्न उदभवल्यास त्याबाबतचा निर्णय महावितरण कंपनीचे संचालक मंडळ आणि कृषी संस्थेचे संचालक मंडळ संयुक्तपणे घेतील.

(घ) **"कृषी ग्राहक" (Agriculture Consumers)** याचा अर्थ, शेतीकामात गुंतलेले आणि आयोगाने वेळोवेळी अधिसूचित केलेल्या दरपत्रकांनुसार (Tariff Schedules) आणि/किंवा लागू असलेल्या नियमांनुसार कृषी ग्राहक म्हणून अधिसूचित केलेले विजेचे ग्राहक असा आहे;

(ड) **"व्यावसायिक अभिलेख" (Business Records)** याचा अर्थ, कृषीव्यवसायाशी किंवा त्याच्याशी संबंधित कोणत्याही मत्तेशी संबंधित सर्व माहिती (ती गोपनीय असो वा नसो आणि संगणकीकृत नोंदींसह कोणत्याही स्वरूपात असो), असा आहे आणि त्यामध्ये खालील बाबींचा समावेश आहे: (क) पुरवठादार आणि विक्रेत्यांच्या याद्या; (ख) सर्व कृषी ग्राहकांची नावे आणि याद्या, आणि विक्री व विपणन माहिती; (ग) कृषी व्यवसायाचे कार्यान्वयन, व्यवस्थापन, प्रशासन किंवा आर्थिक बाबींशी संबंधित माहिती; (घ) कृषी व्यवसायाशी संबंधित महावितरण कंपनी ची हिशेबची पुस्तके आणि नोंदी; (ड.) स्थिर मत्तेशी (Fixed Assets) संबंधित सर्व इमारती

आणि मालमत्ता-संबंधित परवाने, मंजुरी, आराखडे (Layouts), रेखाचित्रे (Drawings) आणि योजनांच्या मूळ प्रती; आणि (च) कृषी व्यवसायाच्या ऐतिहासिक माहितीशी संबंधित सर्व प्रकारचे नोंदवह्या, दस्तऐवज आणि इतर कागदपत्रे; परंतु यामध्ये 'वगळलेल्या व्यावसायिक नोंदी' वगळून;

(च) **"आयोग" किंवा "महाराष्ट्र राज्य नियामक आयोग (MERC)"** याचा अर्थ अधिनियमाच्या कलम ८२ अन्वये घटित करण्यात आलेला 'महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग' असा आहे;

(छ) **"कंपनी"** याचा अर्थ कंपनी कायदा, २०१३ अंतर्गत किंवा समावेशाच्या वेळी लागू असलेल्या कायद्यांतर्गत नोंदणीकृत केलेली कोणतीही कंपनी असा आहे;

(ज) **"करार" (Contracts)** याचा अर्थ, कृषी व्यवसायाशी संबंधित सर्व करार, करारनामे, परवाने आणि इतर करारात्मक व्यवस्था ज्यामध्ये महावितरण कंपनी एक पक्ष आहे, किंवा ज्यातून महावितरण कंपनीला लाभ मिळतात, किंवा ज्यामध्ये महावितरण कंपनी चे हक्क, शीर्षक किंवा हितसंबंध आहेत (ते तोंडी, कृतीद्वारे किंवा लेखी स्वरूपात असोत) असा आहे; परंतु यामध्ये 'वगळलेले करार' समाविष्ट नाहीत.

(झ) **"संचालक" (Director)** याचा अर्थ, कंपनीच्या संचालक मंडळावर नियुक्त केलेला संचालक असा आहे;

(त्र) **"वितरण मत्ता" (Distribution Assets)** याचा अर्थ विजेचे वितरण आणि वहन करण्यासाठी वापरले जाणारे मालमत्ता, सुविधा आणि यंत्रणेचे जाळे असा आहे, ज्यामध्ये संयंत्र (Plant), यंत्रसामग्री, उपकरणे, वितरण वाहिन्या (Lines), ट्रान्सफॉर्मर, ब्रेकर्स, सबस्टेशन्स, स्विचगिअर, मीटर्स, लास्ट माईल कनेक्टिव्हिटी पायाभूत सुविधा आणि इतर संबंधित उपकरणांचा समावेश होतो (मात्र इतक्या मर्यादित नसेल). ही मत्ता महावितरण कंपनीकडेच राहील, परंतु यात 'स्थिर मत्तेचा' (Fixed Assets) समावेश नसेल.

(ट) **"प्रभावी दिनांक" (Effective Date)** याचा अर्थ, १ एप्रिल, २०२६, ज्या तारखेपासून ही योजना अंमलात आल्याचे मानले जाईल असा आहे;

(ठ) **"विद्युत शुल्क" (Electricity Duty)** याचा अर्थ, महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, २०१६ किंवा वेळोवेळी सुधारित केलेल्या इतर कोणत्याही अंमलात असलेल्या कायद्यानुसार आकारले जाणारे शुल्क असा आहे;

(ड) **"निलंबलेख (एस्क्रो) खाते" (Escrow Account)** याचा अर्थ, राज्य शासन आणि/किंवा केंद्र शासन व बहुपक्षीय संस्थांसह इतर कोणत्याही घटकाकडून कृषी संस्थेच्या फायद्यासाठी मिळणारी अनुदाने अर्थसहाय्य (Grants/Subsidies) प्राप्त करण्यासाठी आणि ठेवण्यासाठी तयार केलेले नियुक्त बँक खाते असा आहे. या खात्याचा वापर महावितरण कंपनीला वीज खर्च प्रतिपूर्ती, सेवा शुल्क आणि बाह्यस्त्रोत (आउटसोर्स) सेवांच्या बदल्यात इतर देणी देण्यासाठी केला जाईल.

(ढ) **"वगळलेली मत्ता" (Excluded Assets)** याचा अर्थ, कृषी व्यवसायाचा भाग नाहीत अशा उर्वरित व्यवसायाशी संबंधित सर्व मत्ता असा आहे, ज्यात 'वगळलेल्या करारांचा' समावेश आहे;

(ण) **"वगळलेले व्यावसायिक अभिलेख" (Excluded Business Records)** याचा अर्थ, उर्वरित व्यवसायाशी संबंधित सर्व व्यावसायिक नोंदी, वैधानिक पुस्तके, नोंदवह्या आणि माहिती जी कृषी व्यवसायाचा भाग नाही असा आहे;

(त) **"वगळलेले करार" (Excluded Contracts)** याचा अर्थ, उर्वरित व्यवसायाशी संबंधित सर्व करार, करारनामे आणि व्यवस्था असा आहे;

(य) **"वगळलेली दायित्वे" (Excluded Liabilities)** याचा अर्थ, उर्वरित व्यवसायातून उद्भवलेली सर्व कर्जे, जबाबदाऱ्या आणि इतर दायित्वे (करांसह), जी कृषी व्यवसायाचा भाग नाहीत असा आहे;

(द) **"स्थिर मत्ता" (Fixed Assets)** याचा अर्थ, प्रभावी दिनांकाच्या स्थितीनुसार सध्या महावितरण कंपनी च्या मालकीचे असलेले आणि केवळ कृषी व्यवसायासाठी वापरले जाणारे कृषी ग्राहक मीटर्स आणि संबंधित 'लास्ट माईल कनेक्टिव्हिटी' पायाभूत सुविधा असा आहे; परंतु यामध्ये 'वगळलेली मत्ता' समाविष्ट नाही;

(ध) **"अनुदान" (Grants)** याचा अर्थ, राज्य शासनाकडून कृषी ग्राहकांच्या फायद्यासाठी किंवा कृषी व्यवसायाशी संबंधित कृषी संस्थेला दिलेली सर्व अनुदाने, आर्थिक मदत आणि इतर स्वरूपाचे सहकार्य असा आहे;

(न) **"बौद्धिक संपदा हक्क" (Intellectual Property Rights)** याचा अर्थ, प्रभावी दिनांकाला महावितरण कंपनी च्या मालकीची असलेली आणि कृषी व्यवसायासाठी वापरली जाणारी सर्व बौद्धिक संपदा असा आहे, ज्यामध्ये पेटंट, व्यापारचिन्ह (ट्रेडमार्क), सेवा चिन्ह, व्यापारी नावे, कॉपीराइट, डिझाइन, सार्वजनिक कार्यक्षेत्राची (डोमेन) नावे, तांत्रिक ज्ञान (know-how), व्यावसायिक गुपिते (trade secrets) आणि त्यांच्या अर्जांचा व नोंदणी असा आहे.

(प) **"परवाने" (Licenses)** याचा अर्थ, महावितरण कंपनीला जारी केलेले/ दिलेले किंवा त्यांच्या नावे निष्पादित केलेले सर्व परवाने, परवानग्या, मान्यता मंजुरी, संमती, लाभ, नोंदणी, हक्क प्रमाणपत्रे, जमा खातीनोंद प्रमाणे पत्रे, निवाडे, मंजूरी, वाटपपत्रे, कोटा, ना-हरकत प्रमाणपत्रे असा आहे आणि सवलती, जे कृषी संस्थेला 'किरकोळ पुरवठादार' म्हणून कृषी व्यवसायासाठी आवश्यक आहेत; परंतु यामध्ये वितरण मत्तेची मालकी, कार्यान्वयन किंवा उर्वरित व्यवसायाशी संबंधित कार्यान्वयन परवानग्यांचा समावेश नाही;

(फ) **"महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित" किंवा "महावितरण कंपनी" (महावितरण)** याचा अर्थ, तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या पुनर्रचनेतून स्थापन झालेली सध्याची वितरण परवानाधारक कंपनी असा आहे, जिच्याकडून या योजनेनुसार कृषी व्यवसाय हस्तांतरित केला जाणार आहे; जिचे नोंदणीकृत कार्यालय 'प्रकाशगड', प्लॉट नं. G-9, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१ येथे आहे आणि जिचा उद्योग (कॉर्पोरेट) ओळख क्रमांक (CIN) U40109MH2005SGC153645 हा आहे.

(ब) **"महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (एमएसईबी) होल्डिंग कंपनी लिमिटेड" किंवा "एमएसईबी होल्डिंग"** याचा अर्थ, कंपनी कायदा, १९५६ अंतर्गत नोंदणीकृत असलेली कंपनी असा आहे, जिचे नोंदणीकृत कार्यालय एचएसबीसी बिल्डिंग, तिसरा आणि चौथा मजला, महात्मा गांधी मार्ग, फोर्ट, मुंबई, महाराष्ट्र ४००००१ येथे आहे आणि जिचा उद्योग (कॉर्पोरेट) ओळख क्रमांक (CIN) U40100MH2005SGC153649 हा आहे;

(भ) **"नवीन जोडण्या" (New Connections)** याचा अर्थ, आयोगाने किंवा राज्य शासनाने वेळोवेळी विहित केलेले लागू असणारे विनियम, मानके आणि कार्यपद्धतीं यानुसार प्रभावी दिनांकापासून आणि त्यानंतर कृषी ग्राहकांना दिलेली किंवा दिल्या जाणाऱ्या नवीन वीज जोडण्या असा आहे;

(म) **"बाह्यस्त्रोत (आउटसोर्स) सेवा" (Outsourced Services)** याचा अर्थ, महावितरण कंपनी आणि कृषी संस्था यांच्यात वेळोवेळी होणाऱ्या कंपनी अंतर्गत व्यवस्थेनुसार मान्य केल्याप्रमाणे या योजनेनुसार महावितरण कंपनी द्वारे कृषी संस्थेला पुरविण्यात येणाऱ्या सेवा असा आहे;

(य) **"वीज खर्च प्रतिपूर्ती" (Power Cost Reimbursement)** याचा अर्थ, कृषी ग्राहकांना पुढील विजेचा पुरवठा करण्यासाठी केलेल्या वीज खरेदीसाठी कृषी संस्थेने महावितरण कंपनीला द्यावयाचे आकार शुल्क, असा आहे;

(कक) **"अंतरिम कालावधी" (Provisional Period)** याचा अर्थ, प्रभावी दिनांकापासून त्याप्रमाणे वाटेल महाराष्ट्र शासनाला आवश्यक एक (१) वर्षाचा किंवा त्यापेक्षा अधिक असेल असा कालावधी असा आहे;

(खख) **"उर्वरित व्यवसाय" (Remaining Business)** याचा अर्थ, कृषी व्यवसायाव्यतिरिक्त महावितरण कंपनी चा इतर सर्व व्यवसाय आणि उपक्रम असा आहे, ज्यामध्ये औद्योगिक, वाणिज्यिक, निवासी आणि इतर सर्व कृषी-व्यतिरिक्त ग्राहक श्रेणींसाठी वितरण व्यवसाय, सर्व वितरण मत्तेची मालकी, कार्यान्वयन व देखभाल आणि संबंधित सर्व मत्ता, दायित्वे व करारांचा समावेश होतो;

(गग) **"किरकोळ पुरवठादार" (Retail Supplier)** याचा अर्थ, कृषी ग्राहकांना विजेचा किरकोळ पुरवठा करण्यासाठी जबाबदार असेल अधिनियमांतर्गत एक वितरण परवानाधारक म्हणून कृषी संस्थेचे कार्य, ज्यात नवीन जोडणी (कोणतीही असल्यास) देणे, आंतर कंपनी व्यवस्थेनुसार महावितरण कंपनी द्वारे वीज खरेदीची व्यवस्था करणे, देयके देणे आणि वसुलीचा; यासह परंतु यामध्ये वीज खरेदी करारांचे थेट धारण (holding) आणि वितरण मत्तेची मालकी व देखभालीचा समावेश नसेल असा आहे;

(घघ) **"सेवा शुल्क" (Service Charges)** याचा अर्थ, बाह्यस्त्रोतामार्फत आउटसोर्स सेवा (Outsourced Services) पुरवल्याबद्दल कृषी संस्थेद्वारे महावितरण कंपनी ला देय असलेले शुल्क असा आहे, जे महावितरण कंपनी आणि कृषी संस्था यांच्यातील वेळोवेळी होणाऱ्या कंपनी अंतर्गत व्यवस्थेनुसार मान्य केले जाईल;

(डड) **"राज्य"** याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य, असा आहे;

(चच) **"राज्य शासन"** याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे;

(छछ) **"अर्थसहाय्य" (Subsidy)** याचा अर्थ, दिलेले कृषी ग्राहकसाठी किंवा कृषी व्यवसायाशी संबंधित राज्य शासन किंवा इतर कोणतेही शासकीय प्राधिकरण यांच्याकडून लाभासाठी दिलेल्या सर्व अर्थसहाय्य, सवलती, सूट (रिबेट) आणि इतर स्वरूपाची वित्तीय सहाय्य, असा आहे;

2.2 या योजनेत वापरलेले आणि अधिनियमात किंवा त्याअंतर्गत केलेल्या नियम व विनियमांमध्ये परिभाषित केलेले, परंतु या योजनेत विशेषतः परिभाषित न केलेले इतर सर्व शब्द आणि संज्ञा यांचे अर्थ, अधिनियमात आणि त्याअंतर्गत केलेल्या नियम व विनियमांमध्ये आयोगाने त्यांना जे अर्थ नेमून दिलेले असतील, त्याप्रमाणेच असतील.

भाग- एक

व्यवसायाचे विभाजन

3. महावितरण कंपनीच्या व्यवसायाचे वर्गीकरण

३.१ महावितरण कंपनीच्या व्यवसायाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण केले जाईल:

(अ) कृषी व्यवसाय; आणि

(ब) उर्वरित व्यवसाय.

४ . वितरण परवाना

४.१ कृषी ग्राहकांना वीज पुरवण्यासाठी कृषी संस्था ही, अधिनियमाच्या कलम १३१ ची पोट-कलमे (४) आणि (५) नुसार 'मानीव वितरण परवानाधारक' (Deemed distribution licensee) असेल.

४.२ कृषी संस्था पूर्णपणे आयोगाच्या नियामक अधिकारितेच्या अधीन राहील. आयोग, अधिनियमाअन्वये इतर कोणत्याही वितरण परवानाधारकावर ज्या अधिकारांचा आणि अधिकारितेचा वापर करतो, तेच अधिकार आणि अधिकारिता कृषी संस्थेच्या बाबतीतही लागू असतील.

४.३ राज्य शासन, आयोगाशी विचारविनिमय करून आणि महाराष्ट्र शासन **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, अधिनियमाचे पालन सुनिश्चित करण्यासाठी या योजनेत आवश्यक ते बदल करू शकते.

४.४ कृषी व्यवसायाशी संबंधित आयोगासमोर प्रलंबित असलेल्या सर्व नियामक कार्यवाही, प्रशुल्क अर्ज आणि अनुपालन जबाबदाऱ्यांमध्ये महावितरण कंपनी ऐवजी कृषी संस्थेचे नाव दाखल केले जाईल. कृषी संस्था आणि महावितरण कंपनी लवकरात लवकर अशा बदलाच्या सुनिश्चिततेसाठी आपल्या सर्वतोपरी प्रयत्नांचा वापर करतील परंतु, हे बदल कोणत्याही परिस्थितीत अंतिम हस्तांतरण योजना प्रसिद्ध होण्यापूर्वी पूर्ण करण्यात येतील.

५. महावितरण कंपनीद्वारे कृषी व्यवसायाचे हस्तांतरण

५.१ अधिनियमाच्या आणि या योजनेच्या तरतुदींच्या अधीन राहून, प्रभावी दिनांकापासून (Effective Date), कृषी व्यवसाय आणि त्यांच्याशी संबंधित महावितरण कंपनीकडे असलेल्या सर्व मत्ता व दायित्वे कृषी संस्थेकडे हस्तांतरित होतील आणि कृषि संस्थेमध्ये निहित होतील.

५.२ ही योजना अंमलात आणण्याच्या प्रयोजनासाठी कृषी संस्था आणि महावितरण कंपनी हे कंपनी अधिनियम, २०१३ सह सर्व लागू असलेल्या कायद्यांच्या तरतुदीचे पालन करतील.

५.३ सदर योजनेनुसार:

(क) कृषी संस्थेची आर्थिक स्थिती आणि सुरुवातीचा ताळेबंद (Balance Sheet) परिशिष्ट 'क' मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असेल. (जो ताळेबंद तात्पुरत्या आधारावर तयार करण्यात आला असेल आणि खंड 10 नुसार तात्पुरत्या कालावधीत विधीग्राह्यीकरण रण, पडताळणी, अद्ययावतीकरण आणि अंतिम करण्याच्या अधीन राहील) कृषी संस्था, अशा तात्पुरत्या ताळेबंदात प्रतिबिंबीत झालेल्या कृषि व्यवसायाच्या मूल्याच्या संबंधात मराविमंच्या नावाने धारण संबंधित समभाग आणि इतर संलेख निर्गमित करील. कृषि संस्थेचा ताळेबंद अंतिम झाल्यावर, कृषि संस्था, कृषि व्यवसायाचे अंतिम मूल्य प्रतिबिंबीत होणे आवयशक असलेले मराविमं धारणाकडे निर्गमित केलेल्या समभागांचे आणि इतर संलेखांचे, अतिरिक्त समभाग किंवा संलेख जारी करून, समभाग किंवा संलेख रद्द किंवा पुनर्खरेदी करून, किंवा राज्य शासनाद्वारे निर्धारित केलेले असे अन्य समायोजन या मार्गासह असे समायोजन करील आणि मराविमं होल्डिंग आणि कृषि संस्था, असे दस्तऐवज निष्पदित करील आणि अशी समयोजने अंमलात आणण्यासाठी आवश्यक असलेली अशी पावले उचलील.

(ख) अनुसूची क मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या तात्पुरत्या ताळेबंदात प्रतिबिंबित केलेल्या प्रभावी दिनांकास महावितरण कंपनीच्या पुस्तकामध्ये कृषी ग्राहकांकडून देय असलेल्या सर्व कृषिविषयक प्राप्त रकमा, (जी रक्कम खंड १० ला अनुसरून, तात्पुरत्या कालावधीमध्ये, विधीग्राहयीकरण, पडताळणी, अद्ययावतीकरण आणि अंतिम निश्चितीकरणाच्या अधीन असेल) कृषी संस्थेकडे हस्तांतरित होतील आणि कृषी संस्थेमध्ये निहित होतील. कृषी संस्थेकडून अशा कृषिविषयक प्राप्त रकमा वसूल केल्यावर, अशा प्रकारे वसूल केलेल्या रकमा कृषी संस्थेकडून मराविमं होल्डिंग संस्थेकडे हस्तांतरित करण्यात येतील आणि कृषि संस्थेचे मराविमं होल्डिंगला देय असणारे कृषि संस्थेचे दायित्व, त्यांच्या समतुल्य रकमेइतके कमी होईल.

कृषी व्यवसायाशी संबंधित, प्रभावी दिनाकानंतर, निश्चित करण्यात आलेले देय असलेले कोणतेही दावे, हे थेट कृषी संस्थेचे असतील आणि तिच्याकडे प्राप्त होतील. महावितरणाच्या पुस्तकामध्ये उर्वरित प्राप्त रकमा (अकृषिक ग्राहकांच्या संबंधात प्राप्त रकमा) या, महावितरणाकडे कायम राहतील.

(ग) 'प्रभावी दिनांकापर्यंत', MSEDCL च्या दप्तरी राज्य शासनाकडून देय असलेल्या सर्व अनुदानाची येणी (subsidy receivables)—जी 'कृषी ग्राहकांशी' किंवा 'कृषी व्यवसायाशी' संबंधित आहेत, आणि जी 'अनुसूची क' (Schedule A) मध्ये नमूद केलेल्या तात्पुरत्या ताळेबंदात दर्शविली आहेत (आणि जी रक्कम, 'तात्पुरत्या कालावधीत' कलम १० नुसार विधिग्राहयीकरण, पडताळणी, अद्ययावतीकरण आणि अंतिम निश्चितीच्या अधीन असेल)—ती 'कृषी संस्थेकडे' हस्तांतरित केली जातील आणि तिच्या मालकीची होतील. 'प्रभावी दिनांका'नंतर, 'कृषी व्यवसायाच्या' संदर्भात किंवा त्यांच्याशी संबंधित, राज्य शासनाकडून अर्थसहाय्याच्या ज्या काही रकमा ज्या उपार्जित किंवा देय असतील, त्या थेट 'कृषी संस्थेच्या' मालकीच्या असतील आणि तिलाच प्राप्त होतील.

(घ) या योजनेत विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे केवळ अशा 'स्थिर मत्ता' कृषी संस्थेकडे हस्तांतरित करण्यात येतील व निहित होतील आणि कृषी संस्था 'किरकोळ पुरवठादार' म्हणून काम करेल. वितरण मत्ता (Distribution Assets) मात्र महावितरण कंपनीकडेच राहतील.

(ड) कृषी व्यवसायाच्या हस्तांतरणानंतर, राज्य शासन कृषी संस्थेच्या खेळत्या भांडवलासाठी (Working Capital) किमान २,५०० कोटी रुपयांची हमी (Guarantee) देईल.

(च) या योजनेनुसार महावितरण कंपनीची कोणतीही कर्जे, कर्ज दायित्वे किंवा वित्तीय दायित्वे (सुरक्षित असोत वा असुरक्षित असोत, चालू असोत वा गैर-चालू) कृषी संस्थेकडे हस्तांतरित केली जाणार नाहीत किंवा तिच्याद्वारे स्वीकारली जाणार नाहीत. महावितरण कंपनीची अशी सर्व कर्जे, कर्ज दायित्वे आणि वित्तीय दायित्वे महावितरण कंपनीचीच जबाबदारी म्हणून कायम राहतील आणि त्यासंबंधी कृषी संस्थेची कोणतीही जबाबदारी असणार नाही. वर काहीही अंतर्भूत असले तरी, महावितरण कंपनीकडे असलेल्या कृषी ग्राहकांच्या प्रतिभूती ठेवी या योजनेनुसार कृषी संस्थेकडे हस्तांतरित करण्यात येतील आणि तिच्याकडे निहित होतील.

५.४ या योजनेनुसार, कृषी व्यवसायाचे कृषी संस्थेकडे होणारे हस्तांतरण हे 'प्रभावी दिनांका'पासून (Effective Date) अंमलात येतील; यात काहीही अंतर्भूत असले तरी, हस्तांतरित केलेल्या कृषी व्यवसायाचे मूल्य केवळ तात्पुरत्या आधारावर निर्धारित केले गेले असले तरीही हे हस्तांतरण प्रभावी ठरेल अशा हस्तांतरणाचा मोबदला खंड ५.३ (क) नुसार समायोजनेच्या अधीन असेल.

५.५ शंका दूर करण्यासाठी, कृषी व्यवसायाशी संबंधित किंवा त्या संदर्भातील कृषी ग्राहकांकडून महावितरण कंपनीला देय असलेले सर्व दावे, जे प्रभावी दिनांकाच्या लगतपूर्वीच्या दिनांकापर्यन्त महावितरण कंपनीला प्राप्त झालेले नाहीत, ते प्रभावी दिनांकापासून कृषी संस्थेच्या मालकीचे होतील आणि खंड ५.३ (ख) नुसार कृषि संस्थेद्वारे प्राप्त केले जातील (ब) ३. जर प्रभावी दिनांकापूर्वीच्या अशा प्राप्त रकमेचा कोणताही भरणा प्रभावी दिनांकांनंतर महावितरण कंपनीला कृषी ग्राहकांकडून प्राप्त झाला, तर अशी रक्कम महावितरण कंपनीद्वारे त्वरित निलंब खात्यात जमा करण्यात येईल आणि ती रक्कम कृषी संस्थेने मराविमं होल्डिंगच्या वतीने प्राप्त केली आहे असे मानण्यात येईल. अशी रक्कम प्राप्त झाल्यानंतर, कृषी संस्था ती रक्कम मराविमं होल्डिंगकडे वर्ग करेल आणि खंड (ख) ३, मध्ये नमूद केलेल्या प्रक्रियेनुसार कृषी संस्थेचे मराविमं होल्डिंगला देय असलेले दायित्व तितक्याच रकमेने कमी होईल.

५.६ कृषी संस्था कृषी व्यवसायासाठी स्वतंत्र बँक खाती उघडेल आणि ती कार्यान्वित ठेवील. कृषी संस्था कृषि व्यवसायाशी संबंधित सध्याच्या कृषी ग्राहकांकडून आणि नवीन जोडणी घेतलेल्या ग्राहकांकडून मिळणारा सर्व महसूल जमा करेल.

५.७ कृषी संस्था सेवा शुल्क आणि वीज खर्च प्रतिपूर्ती यासाठी महावितरण कंपनीला पैसे अदा करेल .सेवा शुल्क आणि वीज खर्च प्रतिपूर्ती ही महावितरण कंपनी आणि कृषी संस्था यांच्यात मान्य होणाऱ्या महसूल विभागणी आणि खर्च वसुली व्यवस्थेनुसार निश्चित केली जाईल कृषी संस्थेद्वारे देय असलेले सेवा शुल्क निश्चित असेल आणि आयोगाने आर्थिक वर्ष २०२६-२०३० बहु वर्ष प्रशुल्क नियंत्रण कालावधीसाठी वार्षिक अंदाजे रु. १,५०० कोटी (रुपये एक हजार पाचशे कोटी फक्त) इतकी तरतूद केली आहे. ही रक्कम, महावितरण कंपनी आणि कृषी संस्था यांच्यातील करारानुसार वार्षिक समायोजनेच्या अधीन असेल. अशी व्यवस्था महावितरण कंपनी आणि कृषी संस्था यांच्यातील कार्यात्मक समन्वय आणि वितरण प्रणालीची कार्यक्षमता राखली जाईल याची खातरजमा करेल. शंका दूर करण्यासाठी स्पष्ट करण्यात येते की, कृषी संस्था महावितरण कंपनी चे कोणतेही बँक खाते चालवणार नाही आणि या व्यवस्थेनुसार महावितरण कंपनीला देय असलेल्या सर्व रकमा महावितरण कंपनीच्या नियुक्त खात्यांमध्ये संबंधित करारानुसार हस्तांतरित केल्या जातील.

५.८ पूर्वगामी उपखंडाना बाधा न आणता, ही योजना अंमलात आल्यावर, या योजनेच्या तरतुदीं औपचारिकरीत्या अंमलात आणण्यासाठी महावितरण कंपनी आणि कृषी संस्था आवश्यकतेनुसार सर्व विलेख, पुष्टीकारी विलेख अनुषक्ति विलेखसह , पुष्टीपत्रे, दस्तएवज किंवा इतर लेखी दस्तऐवज निष्पादित करतील यामध्ये संबंधित कंपनी निंबधक आणि योग्य प्राधिकरणांकडे आवश्यक तपशील सादर करणे आणि शुल्कातील फेरबदल नोंदवणे यांसारख्या बाबींचा समावेश असलेल्या योजनेच्या तरतुदीनुसार कृषी संस्था महावितरण कंपनीच्या वतीने असे कोणतेही दस्तऐवज निष्पादित करण्यासाठी आणि सर्व औपचारिकता किंवा अनुपालन पूर्ण करण्यासाठी अधिकृत असल्याचे मानले जाईल.

५.९ राज्य शासन, या प्रयोजनासाठी काढलेल्या आदेशाद्वारे, तात्पुरत्या कालावधीत केव्हाही अनुसूच्यांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अटी आणि शर्तींमध्ये सुधारणा, बदल, फेरबदल करू शकते किंवा त्यामध्ये भर घालू शकते अथवा त्यातून कोणतीही बाब वगळू शकते.

५.१० अनुसूची 'क' चा भाग असलेल्या स्थिर मत्तांचे हस्तांतरण मूल्य हे प्रभावी दिनांकाच्या दिवशी असलेल्या त्यांच्या पुस्तकी मूल्यावरून निर्धारित केले जाईल.

५.११ या योजनेअंतर्गत महावितरण कंपनीकडून कृषी संस्थेकडे होणारे कृषी व्यवसायाचे हस्तांतरण हे आयकर अधिनियम, २०२५ च्या कलम २ (३५) च्या अर्थातर्गत विभाजन असल्याचे मानले जाईल.

६ करार, विलेख आणि परवाने (लायसन)

६.१. सर्व करार (Contracts), विलेख (deeds), बंधपत्रे (bonds), करारनामे, योजना, व्यवस्था आणि इतर कोणत्याही स्वरूपाची विलेख महावितरण कंपनी एक पक्ष आहे किंवा ज्यांचे लाभ मिळण्यास महावितरण कंपनी पात्र असू शकते, आणि जे प्रभावी दिनांकाच्या (Effective Date) आधी पासून अस्तित्वात आहेत किंवा निकटपूर्वी अंमलात आहेत, ते महावितरण कंपनी कडेच निहित राहतील आणि ती ते धारण करील. शंका दूर करण्यासाठी स्पष्ट करण्यात येते की, वीज खरेदी करारांसह (power purchase agreements) कोणताही करार या योजनेनुसार कृषी संस्थेकडे हस्तांतरित केला जाणार नाही. तो पर्यन्त तिला अशा करारांचे लाभ, जो पर्यन्त ती कृषि व्यवसायाशी संबंधित आहेत, महावितरण कंपनी आणि कृषि संस्था यांच्यात होणाऱ्या कराराच्या तरतुदीनुसार मिळतील.

६.२. कृषी व्यवसायाशी संबंधित 'किरकोळ पुरवठादार' (Retail Supplier) म्हणून कृषी संस्थेला आवश्यक असलेले सर्व परवाने (License's), जे प्रभावी दिनांकाच्या आधी पासून अस्तित्वात आहेत किंवा निकटपूर्वी अमलात आहेत, ते कृषी संस्थेकडे हस्तांतरित होतील आणि तिच्याकडे निहित होतील. शंका दूर करण्यासाठी स्पष्ट करण्यात येते की, वितरण मत्तेची (Distribution Assets) मालकी, कार्यान्वयन आणि देखभाल किंवा उर्वरित व्यवसायाच्या कार्यान्वयना संबंधित सर्व कार्यान्वयन परवाने, परवानग्या, मंजुरी आणि नोंदण्या महावितरण कंपनी कडेच राहतील आणि त्या कृषी संस्थेकडे हस्तांतरित केल्या जाणार नाहीत. कृषी संस्थेला महावितरण कंपनीकडे असलेल्या अशा कोणत्याही कार्यान्वयन परवान्यांच्या लाभाची आवश्यकता असल्यास, तो लाभ महावितरण कंपनी आणि कृषी संस्था यांच्यातील करारानुसार उपलब्ध करून दिला जाईल.

६.३. महावितरण कंपनीच्या मालकीचे असलेले आणि केवळ कृषी व्यवसायाशी संबंधित वापरली जाणारी सर्व व्यापार चिन्हे (ट्रेडमार्क्स), व्यापारी नावे (ट्रेड नेमस) , सेवा चिन्हे (सर्व्हिस मार्कस), स्वामीत्वधिकार (कॉपीराइट्स), सार्वजनिक कार्यक्षेत्रातील (डोमेन नेम), संकेत स्थळे (वेबसाइट्स) आणि डिझाइन्स, तसेच किरकोळ पुरवठादार (Retail Supplier) म्हणून कृषी संस्थेच्या कार्याशी थेट संबंधित असलेले सर्व ग्राहक केंद्रित बौद्धिक संपदा अधिकार (Intellectual Property Rights), जे प्रभावी दिनांकाच्या (Effective Date) आधीपासून अस्तित्वात आहेत किंवा निकटपूर्वी अंमलात आहेत, ते कृषी संस्थेकडे हस्तांतरित होतील आणि तिच्यामध्ये निहित होतील. शंका दूर करण्यासाठी स्पष्ट करण्यात येते की, वितरण मत्तेची (Distribution Assets) मालकी, कार्यान्वयन आणि देखभाल किंवा उर्वरित व्यवसाय यांच्याशी (Remaining Business) संबंधित असलेली सर्व गुणवत्ता प्रमाणपत्रे (Quality Certifications), कार्यान्वयनात्मक मान्यता, पर्यावरणीय मान्यता आणि संमती, संविधिक आणि नियामक परवानग्या आणि तांत्रिक ज्ञान (Technical know-how) हे महावितरण कंपनीकडेच राहतील आणि ते कृषी संस्थेकडे हस्तांतरित केले जाणार नाहीत. जर कृषि संस्थेला, महावितरण कंपनीकडे असलेल्या अशा कोणत्याही प्रमाणपत्रांचा, मान्यतांचा किंवा परवानग्यांचा लाभ मिळणे आवश्यक असेल, तर महावितरण कंपनी आणि कृषी संस्था यांच्यात होणाऱ्या करारातील तरतुदींनुसार असा लाभ कृषी संस्थेला उपलब्ध करून दिला जाईल.

६.४. या योजनेच्या तरतुदींच्या अधीन राहून, ज्यामध्ये महावितरण कंपनी एक पक्ष आहे. असे सर्व करार, विलेख, बंधपत्रे, कारारनामे योजना, व्यवस्था आणि इतर कोणत्याही स्वरूपाचे विलेख, या सर्वांसाठी प्रभावी दिनांकांनंतरही महावितरण कंपनी जशी ती प्रभावी दिनांकापूर्वी जबाबदार होती. त्याच प्रकारे जबाबदार राहील कृषी संस्थेवर अशा करारांतर्गत कोणतेही थेट दायित्व किंवा जबाबदारी असणार नाही, आणि तिची जबाबदारी केवळ महावितरण कंपनी आणि कृषि संस्था यांच्यात होणाऱ्या कारारातील तरतुदींनुसार 'वीज खर्च प्रतिपूर्ती' (Power Cost Reimbursement) आणि 'सेवा शुल्क' (Service Charges) देण्यापुरतीच मर्यादित असेल.

६.५. खंड ६.२ नुसार, कृषी संस्थेकडे हस्तांतरित केलेले आहेत असे 'परवाने देणारे संबंधित जावक लिपिक (issuers) आणि दाते, जिथे आवश्यक असेल तेथे, लागू असलेल्या कायद्यानुसार अशा परवान्यांवर कृषी संस्थेच्या नावाचा उल्लेख करतील, जेणेकरून कृषि संस्थेकडे ते निहित करणे आणि कृषि संस्थांना त्यानंतर पुढे किरकोळ पुरवठादार म्हणून विनाअडथळा काम करणे सुलभ होईल.

६.६. पूर्वगामी तरतुदींना बाध न आणता, याव्दारे असे स्पष्ट करण्यात येत आहे की: (अ) महावितरण कंपनी ज्यामध्ये एक पक्ष आहे, असे सर्व करार, विलेख, बंधपत्रे, करारनामे, योजना, व्यवस्था आणि इतर कोणत्याही स्वरूपाचे विलेख, या योजनेनुसार महावितरण कंपनीकडेच राहतील आणि कृषि संस्थेकडे ते हस्तांतरित केले जाणार नाहीत. महावितरण कंपनीच्या बाह्यस्त्रोत सेवांच्या तरतुदींनुसार आणि महावितरण आणि कृषि संस्था या दोन्ही संस्थामधील करारानुसार, या कराराचे लाभ, जेथवर ते कृषि व्यवसायाशी संबोधित आहे, अशा मर्यादपर्यंतच, कृषि संस्थेला उपलब्ध करून देईल; आणि (ब) जर कृषि व्यवसायाचा भाग असलेले कोणतेही परवाने किंवा मत्ता, जे कृषि संस्थेकडे हस्तांतरित करणे गरजेचे असेल, मात्र काही कारणास्तव, कृषि संस्थेकडे अशा प्रकारे हस्तांतरित करता येत नसतील. तर, हस्तांतरण प्रत्यक्षात अमलात येईपर्यंत महावितरण कंपनी, असे परवाने किंवा मत्ता, कृषि संस्थेच्या फायद्यासाठी, अस करणे जेथवर अनुज्ञेय असेल तेथवर, विश्वस्त (trust) म्हणून धारण करेल आणि दरम्यानअंतरिम काळात कृषि संस्थेला त्याचा लाभ मिळवून देईल.

७ . व्यवसायांच्या अभिलेखांचे हस्तांतरण (Transfer of Business Records)

७.१. ही योजना अंमलात आल्यावर, कृषी व्यवसायाशी (Agriculture Business) संबंधित सर्व व्यावसायाचे अभिलेख, कोणत्याही पुढील कृती, विलेख, लेखप्रकरण किंवा गोष्टीशिवाय, कृषी संस्थेकडे (Agri Entity) हस्तांतरित केल्या जातील आणि त्यामध्ये निहित होतील. शंका दूर करण्यासाठी स्पष्ट करण्यात येते की, 'वगळलेला व्यावसायिक अभिलेख" (Excluded Business Records), ज्यामध्ये (अ) उर्वरित व्यवसायाशी संबंधित महावितरण कंपनीची संविधिक पुस्तके आणि नोंदवह्या; (ब) उर्वरित व्यवसायाशी संबंधित जे अभिलेख जतन करणे महावितरण कंपनीला लागू कायद्यानुसार बंधनकारक आहे; आणि (क) उर्वरित व्यवसायाशी संबंधित महावितरण कंपनीची कोणतीही माहिती किंवा अभिलेख यांचा समावेश आहे, ते कृषी संस्थेकडे हस्तांतरित केले जाणार नाहीत आणि त्या महावितरण कंपनीकडे असण्याचे पुढेही चालू राहील.

७.२. प्रभावी दिनांकापासून (Effective Date), कृषि संस्थेला कृषी व्यवसाय चालवण्याच्या प्रयोजनासाठी, या योजनेनुसार हस्तांतरित केलेल्या व्यवसायाच्या नोंदी पाहण्याचा वापर करण्याचा, त्यांचा आणि त्यावर विसंबून राहण्याचा एकमेव अधिकार असेल. व्यवसायाच्या नोंदी मिळवण्यासाठी आणि त्या शोधण्यासाठी महावितरण

कंपनी कृषी संस्थेला सर्व वाजवी सहाय्य करेल आणि कृषी व्यवसायाच्या संबंधित सर्व संगणकीकृत अभिलेख (computerized records) व आधार सामुग्री (डेटाबेस) कृषी संस्थेला वापरण्यायोग्य स्वरूपात (usable format) उपलब्ध करून दिले जातील याची खात्री करेल.

८. तृतीय पक्षांचे हक्क आणि दायित्व यावरील निर्बंध

अधिनियम आणि या योजनेच्या तरतुदींनुसार कृषी व्यवसायाचे (Agriculture Business) हस्तांतरण अंमलात आल्यावर, कृषी व्यवसायाशी संबंधित सर्व व्यक्तींचे हक्क आणि जबाबदाऱ्या ज्यांच्याकडे हस्तांतरित झाले आहेत. केवळ अशा कृषी संस्थेविरुद्धच (Agri Entity) लागू असलेल्या तृतीय पक्ष म्हणून सामील असलेल्या नवलेखात होतील आणि कृषी व्यवसायाशी संबंधित महावितरण कंपनी सोबत कोणत्याही दस्तऐवजात, सलेखांत, करारात किंवा व्यवस्थेत काहीही अंतर्भूत असले तरी, अशी कोणतीही व्यक्ती कृषी व्यवसायासंबंधित राज्य शासन, महावितरण कंपनी किंवा इतर कोणतीही संस्था यांच्याविरुद्ध कोणताही हक्क किंवा हितसंबंधांचा दावा करणार नाही.

९. प्रलंबित वाद आणि कायदेशीर कार्यवाह्या

९.१ ही योजना अंमलात आल्यावर, कोणत्याही संविधीअंतर्गत महावितरण कंपनी द्वारे किंवा महावितरण कंपनी विरुद्ध प्रभावी दिनांकास प्रलंबित असणारे आणि कृषि व्यवसायाशी संबंधित सुरू असलेल्या सर्व कायदेशीर किंवा इतर कार्यवाह्या (कोणत्याही सांविधिक किंवा न्यायीकवत प्राधिकरण किंवा लवाद यांच्यासमोरील कार्यवाह्यासह), रद्द किंवा खंडित होणार नाहीत आणि प्रभावी दिनांकानंतर ते कृषी संस्थेद्वारे किंवा कृषी संस्थेविरुद्ध पुढे सुरू राहतील आणि अंमलात येतील. अशा कार्यवाह्या, जर या योजनेमध्ये विनिर्दिष्ट केलेले हस्तातरण झाले नसते तर, महावितरण कंपनीद्वारे किंवा कंपनीविरुद्ध ज्या रीतीने आणि ज्या मर्यादेपर्यंत सुरू राहिल्या असत्या, चालविण्यात आल्या असत्या किंवा अंमलात आल्या असत्या त्याच रीतीने आणि त्याच मर्यादेपर्यंत सुरू राहतील, चालविण्यात आणि अंमलात येतील.

९.२ एखादी विशिष्ट कायदेशीर किंवा इतर कार्यवाही कृषी व्यवसायाशी संबंधित आहे की नाही हे ठरवताना काही मतभेद किंवा अडचण निर्माण होण्याच्या प्रसंगी, असा वाद किंवा मतभेद महावितरण कंपनी आणि कृषी संस्थेच्या संचालक मंडळाकडे संयुक्त निर्णयासाठी पाठविला जाईल. जर संचालक मंडळ अशा संदर्भाच्या तीस (३०) दिवसांच्या आत कोणत्याही निर्णयावर पोहोचू शकले नाही तर, असा वाद किंवा मतभेद सचिव, ऊर्जा विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडे पाठवला जाईल, या संदर्भातील निर्णय महावितरण कंपनी आणि कृषी संस्थेवर अंतिम आणि बंधनकारक असेल.

९.३ वरील खंड ९.१ मध्ये निर्देश केल्यानुसार, कृषी व्यवसायाशी संबंधित प्रकरणांबाबत महावितरण कंपनी विरुद्ध कोणतीही कार्यवाही हाती घेतल्यास, महावितरण कंपनी, कृषी संस्थेच्या सल्ल्यानुसार आणि कृषी संस्थेच्या खर्चाने त्याविरुद्ध बचाव करेल. ही योजना अंमलात आल्यावर, कृषी व्यवसायाबाबत महावितरण कंपनी द्वारे किंवा विरुद्ध सुरू झालेल्या सर्व कायदेशीर किंवा इतर कार्यवाह्या, कृषी संस्थेच्या नावावर हस्तांतरित केल्या जातील आणि महावितरण कंपनीला वगळून, केवळ कृषी संस्थेद्वारे किंवा कृषी संस्थेविरुद्ध पुढे सुरू राहतील, चालविण्यात येतील आणि अंमलात येतील.

९.४ कोणत्याही संविधि अन्वये महावितरण कंपनीद्वारे किंवा महावितरण कंपनीविरुद्ध असलेल्या सर्व कायदेशीर किंवा इतर कार्यवाह्या, ज्या प्रभावी दिनांकाला प्रलंबित आहेत किंवा भविष्यात सुरू केल्या जाऊ शकतात मग त्या (प्रभावी दिनांकाच्या आधीच्या किंवा नंतरच्या दिनाकांशी संबंधित असो किंवा कसे) आणि ज्या उर्वरित व्यवसायाशी (Remaining Business) संबंधित (महावितरण कंपनीच्या कोणत्याही मालमत्ता, हक्क, अधिकार, दायित्व, बंधने किंवा कर्तव्ये यांच्याशी संबंधित असतील अशासह) आहेत, त्या महावितरण कंपनीद्वारे किंवा महावितरण कंपनी विरुद्धच सुरू राहतील. कृषी संस्था कोणत्याही प्रसंगी उर्वरित व्यवसायाशी संबंधित महावितरण कंपनीद्वारे किंवा महावितरण कंपनी विरुद्धच्या अशा कोणत्याही कायदेशीर किंवा कार्यवाहीसाठी जबाबदार किंवा पात्र असणार नाही.

१०. हक्क आणि दायित्वांचे वर्गीकरण व हस्तांतरण सुरुवातीला तात्पुरते असणे

१०.१ या योजनेअंतर्गत कृषी व्यवसायाचे वर्गीकरण आणि हस्तांतरण, जोपर्यंत राज्य शासनाच्या आदेशाद्वारे अन्यथा विनिर्दिष्ट केले जात नाही तोपर्यंत, केवळ विधी ग्राहयता, सत्यापन, अद्यावतीकरण आणि लेखे अंतिम करणे, ताळेबंद यांना अंतिम रूप देणे आणि मत्ता व दायित्वांचे वाटप प्रयोजनार्थ 'अंतरिम कालावधी' (Provisional Period) दरम्यान तात्पुरते असेल. शंका दूर करण्यासाठी असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अंतरिम कालावधीतील हस्तांतरणाचे अश्या तात्पुरत्या स्वरूपामुळे कृषी संस्थेद्वारे चालवल्या जाणाऱ्या कृषी व्यवसायावर परिणाम होणार नाही, जो प्रभावी दिनांकापासून खंड न पडता पुढेही सुरू राहील.

१०.२ अंतरिम कालावधीत कोणत्याही वेळी, राज्य शासनास (महाराष्ट्र शासन) राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, अधिनियमच्या तरतुदीनुसार राज्य शासनास योग्य वाटेल अशा रीतीने आणि अशा अटी व शर्तींवर हस्तांतरणाच्या अटी व शर्तींमध्ये सुधारणा, बदल किंवा फेरबदल, भर घालणे, वगळणे किंवा अन्यथा हस्तांतरणाच्या अटी व शर्ती कमी –अधिक करणे, कृषि व्यवसायाचा भाग असलेली कार्ये, मालमत्ता, हितसंबंध, हक्क, दायित्वे, कर्मचारी आणि कृषि व्यवसायाशी घटित करण्याच्या कोणत्याही कार्यवाह्या कृषी संस्थेकडून महावितरण कंपनी कडे किंवा त्याउलट हस्तांतरित करणे यासह, करता येऊ शकेल. एखादी मालमत्ता कृषी व्यवसायाशी संबंधित

आहे किंवा कसे याबाबत महावितरण कंपनी आणि कृषी संस्था यांच्यामध्ये वाद किंवा मतभेद उद्‌भवन्याच्या प्रसंगी असा वाद किंवा मतभेद, ऊर्जा विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडे निर्देशित करण्यात येईल, ज्यांचा या संबधातील निर्णय, महावितरण कंपनी आणि कृषी संस्था यांच्यासाठी अंतिम आणि बंधनकारक असेल.

१०.३ राज्य शासन, महाराष्ट्र शासनाच्या **राजपत्रात** 'अंतिम हस्तांतरण योजना' प्रसिद्ध करेल, ज्यामध्ये प्रभावी दिनांकाच्या स्थितीनुसार महावितरण कंपनी आणि कृषी संस्था यांच्यामधील सर्व मत्ता, दायित्वे, हितसंबंध, हक्क आणि जबाबदाऱ्यांचे अंतिम वाटप असेल. अशा प्रकाशनानंतर, या योजनेनुसार लागू करण्यात आलेले सर्व हितसंबंध, हक्क आणि दायित्व यांसह कृषी व्यवसायाचे हस्तांतरण अंतिम होईल आणि या योजनेअंतर्गत हस्तांतरणाची प्रक्रिया सर्व हेतु व उद्देशांसाठी पूर्ण होईल.

११. कायदेशीर प्रक्रियेद्वारे हस्तांतरण

११.१ या योजनेअंतर्गत होणारे हस्तांतरण राज्य शासन, महावितरण कंपनी, कृषी संस्था किंवा अन्य कोणतीही व्यक्ती यांनी केलेली कोणतीही आणखी कृती, विलेख किंवा आवश्यक गोष्टी यांना अनुरूप राज्य शासनाने काढलेले आदेश आणि या योजनेच्या तरतुदीं, या योजनेमध्ये घालून दिलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून, कार्यान्वित होतील आणि लागू होतील.

१२. अंतरिम कालावधीत कृषी संस्थेचे हक्क, कर्तव्ये आणि अधिकार

१२.१ या योजनेच्या अटींच्या आणि कलम १४ च्या तरतुदींच्या अधीन राहून, अंतरिम कालावधीत कृषी संस्था ही कृषी व्यवसायाची मालक असेल आणि ती तो चालवेल. राज्य शासन, अंतरिम कालावधीत वेळोवेळी खंड १०.३ आणि अधिनियमाच्या तरतुदींनुसार या योजनेच्या अटींमध्ये सुधारणा, बदल किंवा फेरबदल करणारे आदेश काढू शकते.

१३. राज्य शासनाच्या निर्णयांची अंतिमता

१३.१ या योजनेअंतर्गत लागू झालेल्या हस्तांतरणाबाबत जर कोणतीही शंका, वाद, मतभेद किंवा मुद्दा उद्‌भवला तर त्याबाबतचा राज्य शासनाचा निर्णय, अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीन राहून, सर्व पक्षांवर अंतिम आणि बंधनकारक असेल.

१३.२ या योजनेअंतर्गत हस्तांतरणाची अंमलबजावणी करताना येणाऱ्या कोणत्याही अडचणी दूर करण्यासाठी, राज्य शासन, महाराष्ट्र शासनाच्या **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे आवश्यक तरतुदी करू शकते; परंतु अशा तरतुदी अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत असणार नाहीत.

१३.३ राज्य शासन, महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, या योजनेत किंवा यातील कोणत्याही खंडात विनिर्दिष्ट केलेल्या अटी व शर्तींमध्ये केव्हाही आणि त्याला योग्य वाटतील अशा सुधारणा, बदल, फेरबदल, भर किंवा घट करू शकते किंवा त्यामध्ये बदल करू शकते.

१४. मुद्रांक शुल्कातून सूट

या योजनेअंतर्गत लागू केलेले आणि त्यास अनुरूप असलेले हस्तांतरण आणि त्यांची अंमलबजावणी यास, राज्य शासनाकडून आणि राज्यातील सर्व स्थानिक संस्थांकडून लादणात आलेले सर्व मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, कर, शुल्क, कर आकारणी आणि अन्य आकार यापासून सूट देण्यात येईल, अशी सूट ही, उचित शासन निर्णय निर्गमित करण्याच्या आणि राज्य शासनाद्वारे मंत्रिमंडळ निर्णयाच्या अधीन असेल.

भाग 2

प्रभावी दिनांकानंतरची दायित्वे

१५. वीज खरेदी आणि इतर व्यवस्था

